**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजपा सर्वात मोठा पक्ष, २९ पैकी २५ ठिकाणी सत्ता स्थापन करण्याची तयारी असल्याचा मुख्यमंत्र्यांना विश्वास

- मुंबईत ठाकरे बंधू तर पुण्यात पवार कुटुंब मोठा करिश्मा दाखवण्यात अपयशी

- राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात

- स्टार्ट अप अभियानानं गेल्या १० वर्षांमधे क्रांती घडवून आणली असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- एक हजार कोटींच्या घोटाळ्याप्रकरणी सीबीआयकडून पंजाब अँड सिंध बँकेच्या १८ जणांविरुद्ध तक्रार दाखल

**<><><><><>**

आतापर्यंत आलेल्या निकालानुसार **बृहन्मुंबई महानगरपालिकेत** भाजपा आणि शिवसेना महायुतीला निर्णायक आघाडी मिळणार हे आता स्पष्ट झालं आहे. आतापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार भाजपा ८४ जागांवर तर शिवसेना २६ जागांवर विजयी झाली आहे. दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला ६३ जागांवर तर राज ठाकरे यांच्या पक्षाला ७ जागांवर यश मिळालं आहे. काँग्रेसने २३ जागा जिंकल्या.

**ठाणे** महानगरपालिकेत शिवसेना ५५, भाजपा २५, राष्ट्रवादी काँग्रेस ८ ठिकाणी विजयी झाले आहेत. मात्र, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मनसे

आघाडीच्या पदरी सपशेल निराशा पडली. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला आतापर्यंत आलेल्या माहितीनुसार केवळ एक जागा मिळाली आहे तर मनसेला भोपळाही फोडता आला नाही. दुसरीकडे शरद पवार यांच्या पक्षाने ११ आणि अजित पवार यांच्या पक्षाने ८ जागा जिंकल्या आहेत.

**१६५ जागांच्या पुणे महानगरपालिका** निवडणुकीत भारतीय जनता पक्षानं निर्णायक आघाडी घेतली असून एकहाती सत्ता स्थापन करण्याचा पक्षाचा मार्ग मोकळा झाला आहे. इथं भाजपनं शतक पूर्ण केलं आहे. अजित पवार यांच्या पक्षाला १५ आणि शरद पवार यांच्या पक्षाला तीन जागा मिळाल्या आहेत. तर काँग्रेसने १३ ठिकाणी विजय मिळवला आहे.

**पिंपरी-चिंचवड** महानगरपालिका निवडणुकीतही भाजपाला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचं चित्र आहे. भाजपाने ८३ जागा जिंकल्या आहेत. शिवसेनेला सात जागावर यश मिळालं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसने पिंपरी चिंचवडमधे ५७ जागा जिंकल्या आहेत. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा शऱद पवारांच्या पक्षाला एकही जागा जिंकता आली नव्हती.

**नाशिक** महापालिकेत भाजपला ६० जागांवर विजय मिळाला असून ३७ जागांवर शिवसेना विजयी झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला आणि काँग्रेसला प्रत्येकी ३, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला १२ जागांवर विजय मिळाला आहे. मनसेला एका जागेवर तर इतरांना ५ जागांवर विजय मिळाला आहे.

**मालेगाव** महापालिकेत इस्लाम पार्टीने सर्वाधिक ३५ जागांवर विजय मिळवला असून एमआयएमला २१ जागांवर विजय मिळाला आहे. शिवसेनेने १८ जागांवर

विजय मिळवला असून भाजपला २ जागांवर तर काँग्रेसला तीन जागांवर विजय मिळाला आहे.

**छत्रपती संभाजीनगर** महापालिकेत २९ प्रभागांमधल्या ११५ जागांपैकी ५८ जागांवर भाजप विजयी झाला आहे. शिवसेनेला १२ जागांवर विजय मिळाला. तर एमआयएम २४ जागांवर विजयी ठरला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ६ जागांवर विजयी झाला असून वंचित बहुजन आघाडी ४ तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला अवघ्या एका जागेवर विजय मिळाला.

**लातूर** महापालिकेत १८ प्रभागांमधल्या ७० जागांपैकी ४३ जागांवर काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले आहेत. भाजपाला २२ जागांवर तर अपक्षांना ४ जागांवर विजय मिळाला आहे.

**आतापर्यंत हाती आलेल्या बातमीनुसार नागपूर महानगरपालिकेच्या** एकूण १५१ जागांपैकी भाजपाने १०४ जागा जिंकल्या आहेत. तर  काँग्रेसला ३३ जागांवर विजय मिळाला आहे. उद्धव ठाकरे यांच्या पक्षानं २ जागांवर विजय मिळवला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या जनतेने एनडीएच्या सुशासनाच्या अजेंड्याला आपले आशीर्वाद दिले असून एनडीए बरोबरचं नातं आणखी दृढ केल्याची प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या विजयानतंर दिली आहे. राज्यातल्या २९ पैकी २५ महापालिकांमध्ये भाजपा किंवा महायुतीचा महापौर येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज व्यक्त केला. महापालिका निवडणुकांच्या निकालानंतर मुंबई भाजपा कार्यालयात आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. मुंबईतही महायुतीचाच महापौर

असेल, असा दावा त्यांनी केला. विकासाच्या अजेंड्याला जनतेनं पाठिंबा दिला आहे. तोच अजेंडा पुढे नेऊन शहरांचा विकास करायचा असल्याचं ते म्हणाले.

जनतेचा कौल सर्वोच्च असून तो आपण आदरपूर्वक स्वीकारत आहोत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जनतेचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी दुप्पट जोमानं काम करत राहू असं राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आपली प्रतिक्रिया देताना म्हणाले. राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीत नगरसेवकपदी बहुमताने विजयी झालेल्या काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अभिनंदन केलं आहे. तसंच, हा विजय भाजपने पैशाच्या जोरावर आणि दमदाटी करून मिळवल्याची टीकाही सपकाळ यांनी केली.

<><><><><>

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या निकालांचं विश्लेषण करणारा विशेष कार्यक्रम ‘निवाडा महानगरांचा’, आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्त विभागातर्फे सादर करण्यात येणार आहे. आज रात्री ८ वाजून १० मिनिटांपासून हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. दररोज रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र आज रात्री ८ वाजता प्रसारित होत आहे.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात झाली. या टप्प्यात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांसाठी निवडणुका होणार आहेत.

२१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने यासाठी अर्ज भरता येतील. २२ जानेवारीला अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. याच दिवशी अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होईल आणि मतदान चिन्ह वाटप

होईल. ३ तारखेला मध्यरात्रीपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येईल आणि ५ फेब्रुवारीला सकाळी साडे ७ ते साडे ५ दरम्यान मतदान होणार असून ७ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

**<><><><>**

स्टार्ट अप अभियानाने गेल्या १० वर्षांमधे क्रांती घडवून आणली असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राष्ट्रीय स्टार्टअप दिनानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं आयोजित कार्यक्रमात आज ते बोलत होते. प्रत्यक्ष समस्यांना भिडण्याचं उद्दिष्ट युवकांनी ठेवलं असून त्यांच्या स्वप्नांचा प्रवास या दहा वर्षात अनुभवला असल्याचं ते म्हणाले....

**होल्ड- प्रधानमंत्री**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी सांगितलं की २०१६ मधे ही मोहीम सुरु झाली त्यावेळी अवघे ४०० स्टार्टअप होते, ती संख्या आता दोन लाखांवर गेली आहे. या कार्यक्रमात  प्रधानमंत्र्यांनी स्टार्ट अप उद्योजकांशी संवाद साधला. स्टार्ट अप संकल्पना कार्यान्वित झाल्याच्या दशकपूर्तीनिमित्त या विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. १६ जानेवारी २०१६ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या उपक्रमाचा प्रारंभ केला होता. नवोन्मेषाला चालना, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि गुंतवणूक-आधारित विकास हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. २०१४ नंतर दीड लाखापेक्षा जास्त नवीन उपक्रम सुरु झाले, सुमारे साडे १७ लाख रोजगारनिर्मिती झाली असून, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप परिसंस्था ठरला आहे.

**<><><><>**

सायबर गुन्हेगारीतून मिळवलेल्या १ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची अफरातफर केल्या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण संस्था सीबीआयने पंजाब अँड सिंध

बँकेच्या व्यवस्थापकासह १८ जणांविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. बँकेच्या केवायसीचे खोटे दस्तऐवज बनवून राजस्थानमधल्या एका बँकेच्या शाखेत १३ कंपन्यांच्या नावे बनावट खाती उघडण्यात आली. या खात्यांमध्ये बेकायदेशीर मार्गांनी मिळवलेली रक्कम हस्तांतरित करण्यात आली होती. या खात्यांमधून बेकायदेशीर पद्धतीने मोठ्या रकमेचे व्यवहार करण्यात आले होते. त्यामुळे सीबीआयने तक्रार दाखल केली आहे.

<><><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत गुजरात जायंट्सचा सामना आज गुणतालिकेत पहिल्या स्थानावर असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूशी होत आहे. नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात गुजरात जायंट्स संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा बेंगळुरू संघाच्या ६ षटकांमध्ये ४ बाद ४५ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प रविवारी १ फेब्रुवारीला सादर होणार आहे. त्यादिवशी शेअर बाजार सुरू ठेवण्याचा निर्णय मुंबई शेअर बाजार आणि राष्ट्रीय शेअर बाजारानं घेतला आहे. नेहमीच्या वेळेत म्हणजे सकाळी सव्वा ९ ते दुपारी साडे ३ पर्यंत दोन्ही शेअर बाजारात व्यवहार होतील.

<><><><><>

भारत आणि जपान यांच्यातली विशेष धोरणात्मक आणि जागतिक भागीदारी सातत्यानं पुढे जात असल्यांचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत अठराव्या भारत जपान धोरणात्मक संवाद परिषदेत बोलत होते.

//<><><><><>//